Pune Police

प्रेस नोट दि.२७/०९/२०१७

## चंदननगर पोलीसाची कामगीरी - सराईत घरफोडया करणाऱ्या आरोपीस केली अटक

चंदननगर पोलीस ठाणे येथील रेकॉर्डवरील गुन्हेगार नामे ईश्वर विष्णू कापसे यास घरफोडी चोरी करण्याचा प्रयत्न करीत असताना पकडून त्याचेकडे पोलीस कस्टडी मुदतीत केले तपासात त्याने बिडीकामगार वसाहत व शितकल वस्ती, चंदननगर पुणे येथे दीड महिन्यापूर्वी कटवणीच्या सहाय्याने दोन घरफोडया चोऱ्या केल्या असल्याचे उघडकीस आल्या असून त्याचेकडून सदर गुन्हयातील चोरी केलेला माल दोन सोन्याच्या अंगठया व कर्णफुले व एक सॅमसंग कंपनीचा महागडा असा सर्व मिळून किं.रू.२१,७००/- चा माल हस्तगत करून दोन घर फोडया चोऱ्या व एक घर फोडी चोरी करण्याचा प्रयत्न असे तीन गुन्हे उघडकीस आणले आहेत. सदर आरोपी सध्या येरवडा कारागृहामध्ये आहे.

उपरोक्त कारवाई पोलीस उप आयुक्त सो.परी मंडळ ४ श्री दिपक सोकोरे, सहा पोलीस आयुक्त सो. खडकी विभाग श्री वसंत तांबे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक चंदननगर पोलीस स्टेशन श्री.राजेंद्र मुळीक, यांचे मार्गदर्शनाखाली सहा. पोलीस निरीक्षक श्री सुनिल निगुडकर, पो.हवा.मोहन वाळके, पो.शि अमोल गायकवाड यांनी केली आहे .